

S/114

वादळांतील दीपस्तंभ

गोपाल नीलकण्ठ दांडेकर

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर लिखित

कादंबरीमय शिवकाल

गरजत्या महाराष्ट्राचें जिवंत चित्रण
करणाऱ्या पांच उत्कृष्ट कादंबऱ्या

- ☐ बया दार उघड
- ☐ हर हर महादेव
- ☐ दर्या भवानी
- ☐ झुंजारमाची
- ☐ हे तो श्रींची इच्छा

RSS Archives

11

(4)

RSS Archives

RSS Archives

ॐ ५०
केशव कुंज झण्डेवाला
देशबन्धु गुप्ता मार्ग
नई दिल्ली-११००५५

वादळांतील दीपस्तंभ

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

RSS Archives

मॅजेस्टिक प्रकाशन

वादळांतील दीपस्तंभ
मार्च, १९८९

© गो. नी. दांडेकर,
प्रशांता, तुळशीबागवाले वसाहत,
पुणे ९.

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६, प्रसाद चेंबर्स, गिरगाव,
मुंबई ४०० ००४.

मुद्रक :
रवींद्र केशव कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०२०.

मुखपृष्ठ : रविमुकुल

मूल्य : ६० रुपये

RSS Archives

माझा उदारहृदय मित्र
श्रीकांत गोखले
आणि
त्याची पत्नी
सौ. स्मिता
या दाम्पत्यास–

– आप्पा दाण्डेकर

RSS Archives

RSS Archives

शु भ का म ना

श्री. गो. नी. दांडेकर यांस,

परमपूजनीय डॉक्टर हेडगेवार यांच्या जन्मशताब्दीच्या या वर्षी त्यांचें जीवन व कार्य सर्वांना सहजपणें समजावें, याकरितां आपण त्यांच्या जीवनावर 'वादळांतील दीपस्तंभ' या नावानें एक कादंबरी लिहिली आहे. तिच्या हस्तलिखिताचीं टिपणें मला माझ्या लोणावळ्याच्या मुक्कामांत वाचून दाखवण्यांत आलीं होतीं. आपला स्वतःचासुद्धां आपल्या बालवयांत प्रत्यक्ष डॉक्टरांशीं संपर्क आला होता व यौवनांतील कांही वर्षें आपण स्वतः संघाचे प्रचारक म्हणून कामही केलें होतें. त्यामुळें स्वाभाविकपणें डॉक्टरांविषयींच्या अत्यंत आपुलकीनें परिश्रमपूर्वक त्यांच्याविषयी बरीच माहिती मिळवण्याचा प्रयास आपण केला आहे. त्यामुळें संघस्थापनेपूर्वीच्या बऱ्याच लोकांना माहीत नसलेल्या, डॉक्टरांच्या जीवनांतील अनेक प्रसंगांचें वर्णनही आपल्या ह्या लिखाणांत येणें स्वाभाविकच आहे.

वाढतें वयोमान व अस्वस्थ प्रकृति असूनही, जन्मशताब्दीच्या या वर्षांत आपल्या हातून हें लिखाण प्रसिद्ध होत आहे, हें पाहून अतिशय आनंद वाटतो.

मराठी ललित साहित्यामध्यें संघनिर्मात्याविषयीं लिहिलेली ही कादंबरी हें एक वैशिष्ट्यच म्हणावें लागेल.

आपलें त्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन करून आपणांस प्रदीर्घ निरामय आयुष्य अशा प्रकारें साहित्य निर्मितीद्वारां देशसेवा करण्यासाठीं प्राप्त होवो, हीच या प्रसंगीं श्री परमेश्वरचरणीं प्रार्थना करतों.

आपला,
म. द. देवरस

RSS Archives

नि वे द न

लहानपणीं नागपूरला असतांना किती एकदां डॉक्टरांस पाहिलें होतें. त्या काळांत काँग्रेसचें आंदोलन सुरू होतें. त्या निमित्तानें सभा होत. त्या सभांमधून डॉक्टरांची ती भव्य, रुबाबदार मूर्ति दिसे. एकदां पाहिलें, कीं विस्मरण होऊं नये, असें डॉक्टरांचें व्यक्तिमत्त्व होतें.

आठवतें, कीं छोटी धनतोलीवर लागणाऱ्या एका संघशाखेंतही मी चुकूनमाकून जात असें. एका तलावाच्या कांठीं भरलेल्या संघ–शिबिरासही गेल्याचें स्मरतें आहें. तिथें डॉक्टरांची प्रत्यक्ष भेट झाली.

त्यानंतर सुरू झालें १९३० सालचें काँग्रेसचें आंदोलन. घरीं असतों, तर त्या आंदोलनांत भाग घ्यायला मिळाला नसता, म्हणून घरून पळून मुंबईस गेलों. आंदोलन संपल्यावर मग जीवनांत अनेक उलथापालथी झाल्या, अन् शेवटीं वैयक्तिक मोक्षाचे मार्गे लागून नर्मदापरिक्रमा सुरू केली. ती संपवून मंडलेश्वरीं आलों, कारण तिथें गुरुदेव राहात होते. आणि इतक्या वर्षांनंतर इथें संघाची पुन्हां गांठ पडली. हें लक्षात आलें, कीं वैयक्तिक मोक्षापेक्षां सामूहिक मोक्ष अधिक महत्त्वाचा आहे.

हें ध्यानीं येतांच मी संघाचा प्रचारक म्हणून काम करूं लागलों. प. पू. डॉ. हेडगेवारांनीं दाखविलेल्या वाटेनें चालूं लागलों.

त्यांची ही चरित्रात्मक कादंबरी.

प्रिय मित्र कै. नाना पालकर यांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण.
त्यांनीं परिश्रमपूर्वक लिहिलेलें कै. प. पू. डॉक्टरांचें चरित्र ही तर या कादंबरीची आधारशिला आहे.

तसेच आभार श्री. भाऊराव देवरस यांचे. त्यांनीं मला या दिशेनें प्रवृत्त केलें नसतें, तर या वयांत मीं हें काम हातीं घेतलें नसतें.

–आप्पा दाण्डेकर

ॐ

प्रतिज्ञा.

सर्व शक्तिमानेश्वरा ला वं आपल्या पूर्वजांना स्मरून
मी प्रतिज्ञा करीत आहे, आपला पवित्र हिंदु धर्म, हिंदु संस्कृती
व हिंदु समाज यांचे संरक्षण करून, हिंदु राष्ट्राला स्वतंत्र
करण्यासाठी, मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची घटक
झाली आहे. संघाचे कार्य मी प्रामाणिकपणे करीन, निःस्वार्थ
बुद्धीने व तनमनधनाने पूर्वक करीन व हे व्रत मी
आजन्म पाळीन.

॥ जय जगदंबे जय जगदंबे ॥

हवसे मास्तर वर्गातल्या अवघ्या मुलांकडून गाणें पाठ करवून घेत होते. तें त्यांनीं चांगल्या ठसठशीत अक्षरांत खडूनें फळ्यावर लिहिलें होतें.

विक्तुरिया धन्य सती
अवतरली या जगतीं
भरतखंडि जन म्हणती
सिता देवि ती ॥
दयावंत भाग्यशाली
पृथ्वीपती राणि झाली
आर्यजनां सनद दिली
सुखि करी प्रजा ॥

नागपूरच्या नीलसिटी हायस्कूलमधील इंग्रजी दुसरीच्या फळ्यावर लिहिलेलें तें राजनिष्ठेनें ओथंबलेलें गीत बहुधा सर्व मुलांनीं पाठ केलें होतें.

केलें नव्हतें एका मुलानें. त्याचें नांव केशव बळिराम हेडगेवार! त्याचें वय तर केवळ बारा वर्षांचें होतें. पण मन? तें त्याही वयांत आपणांवर राज्य करणाऱ्या इंग्रज सरकाराविषयींच्या तिरस्कारानें तुडुंब भरलें होतें. त्याच्या मनीं उमटत होतें, कीं

– कुठें जगज्जननी सीता, आणि कुठें ही विक्तुरिया? दोघींची तुलना? छे! कुठें माता जगदंबा आणि कुठें हिडिंबा? त्याचें मन थेट्टमध्यैंदेखील त्या दोघींची तुलना करायला तयार नव्हतें. तें चिंतायचें, सनद देऊन प्रजा सुखी केली, कुठें आहे तें सुख? मग हे जे कोट्यवधि रुपये दरवर्षी इंग्लंडला जाताहेत, ते काय म्हणून? आणि तेही इथल्या गोरगरिबांच्या, दरिद्री किसानांच्या नरडीवर पाय देऊन! त्यांच्यावर नाना परींचे अत्याचार करून!

छे छे! मी हें गीत पाठ करणार नाहींच. इतर मुलांसवें म्हणणारही नाहीं.

म्हातारे, हाडें निघालेले हत्ती, त्यांवर कळा हारपलेल्या अंबाऱ्या, त्यांत बसलेले रघूजीराजे भोसले, जनलोक त्यांना अजूनही वांकून करीत असलेले मुजरे, ते स्वीकारतांनाची राजांच्या मुद्रेवरची खिन्नता! हत्तींमागें चालणारे, फांसळ्या दिसत असलेले